पुणे जिल्हा परिषद,
शिक्षण विभाग(माध्यमिक)
शिक्षण/माध्य/ह.४/त.अ./८६-८७
दिनांक : ६-३-८७



प्रति,
मुख्याध्यापक,
मेहबूब उर्दू हायस्कूल दौंड ता. दौंड जि. पुणे

BOOK-POST

विषय :- सन ८२-८३ या वर्षी व तत्पूर्वी सुरु करण्यात आलेल्या (शासन मान्यतेने) अशासकीय माध्यमिक शाळांना तदर्थ अनुदान १९८६-८७

...

संदर्भ :- शासन निर्णय क्र.एसएसएन १०८६/(७६४)एन.मा.शि-१ दिनांक २१ जाने. ८७ व शासन पत्र क्र.एसएसएन १०८६ (७६४.१) एन.माशि-१, दिनांक १८-११-८६

उपरोक्त शासन निर्णयानुसार आपल्या शाळेत तदर्थ अनुदान देणेबाबत विचार चालू आहे. सदरचे तदर्थ अनुदान मिळणेसाठी खालील आवश्यक ती माहिती पडताळुन पहाणे आवश्यक आहे. तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.शिक्षण/माध्य./ह.१/१९८६-८७ पुणे दिनांक २४-६-८६ अन्वये आपणांस कळविणेत आल्याप्रमाणे लेखातपासणी साठी व संबंधीत माहिती संबंधी खात्री करुन घेणेसाठी आपण सर्व संबंधीत कागदपत्रे घेवुन आपण स्वतः दिनांक २१-३-१९८७ रोजी ठिक १० वाजता या महात्मा ज्योतिराव फुले, नाना पेठ,पुणे २ येथे उपस्थित रहावे.

सोबत आणावयाची आवश्यक ती माहिती -

१) उपरोक्त पत्रान्वये मागविणेत आलेली माहिती व लेखा तपासणी अहवाल सन ८५-८६

२) तदर्थ अनुदान मिळणेसाठी माध्यमिक शाळा संहिता नियम ९३ मधे नमुद केल्याप्रमाणे करावयाचा अर्ज (लेखा तपासणी अहवालासह ).

..२

३) संस्था नोंदणी संबंधीची कागदपत्रे.

४) शाळेमधे इ.१० वी पर्यंतचे वर्ग सुरु असल्यासंबंधीच्या नोंदी.

५) माध्यमिक शाळा अनुदान तरतुदीनुसार शिक्षक व शिक्षकेतर वर्ग नेमला आहे काय? असल्यास त्यांना नियमानुसार वेतन अदा केले जाते काय? (नेमणुकीसंबंधी व वेतनासंबंधीच्या आवश्यक ) त्या नोंदी असणारे रेकॉर्ड ).

६) संस्थेविरुध्द गैरव्यवहारासंबंधी प्रकरणे असतील तर त्यासंबंधीची माहिती.

७) सरासरी हजेरी बाबतची अट पूर्ण केली आहे काय? (हजेरी पत्रके सादर करणे आवश्यक आहे.)

८) शासनाचे वेळोवेळी निघणारे आदेशाचे पालन करण्यांत येत असल्याबाबत संमती पत्र.

सर्व संबंधीत कागदपत्रे घेवुन आपण नियोजित ठिकाणी नियोजित केलेल्या वेळी आपण उपस्थित, वरील सर्व बाबींची पूर्तता केल्याशिवाय आपणांस तदर्थ अनुदान अदा करण्यांत येणार नाही, यांची नोंद घ्यावी, उपरोक्त ठिकाणी आपण उपस्थित राहू शकला नाही तर पुढील परिणामांची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही. तसेच अनुदान अदा करणे हे पूर्णपणे वरच्या अटी पूर्ण करण्याच्या शर्तीवर अवलंबुन असल्याने, अटी पूर्ण करणे अत्यावश्यक आहे.

प्रत :
मुख्याध्यापक,
म.ज्योतिराव फुले हायस्कुल.

आपला विश्वासू,

(signature)
शिक्षणाधिकारी,
जि.प.पुणे करिता ..

Recieved
(signature)
27-3-87